पिरपहाडी दर्गा येथे विकास कामाचे माजी आ. संजय रायमुलकर यांच्या हस्ते भूमिपूजन >> पान 2

अधिक सक्षम होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक - प्रधान सचिव ब्रिजेश सिंह >> पान 3

आयशरच्या धडकेत १८ वर्षीय युवती ठार >> पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**
कष्ट आणि प्रयत्नाशिवाय यश कधीच मिळत नाही.

apalavidarbhlivenews@gmail.com   मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 128 ■ गुरूवार, दि. 19 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



प्रेक्षकांना खळखळून हसवताना हा अभिनेता बनला खलनायक, तेव्हा चित्रपटाने केली बजेटच्या ४ पट कमाई
आतील पान

# गेटवे ऑफ इंडियाहून एलिफंटाकडे जाणारी बोट उलटली

## बोटीत ३० हून अधिक प्रवासी; बचावकार्य युद्धपातळीवर सुरु

### १३ जणांना जलसमाधी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबईत गेट ऑफ इंडियाजवळच्या समुद्रात नौदलाच्या स्पीड बोटीची प्रवासी वाहतूक करणाऱ्या खासगी फेरीला धडक बसल्याने मोठा अपघात झाला. या धडकेत प्रवासी बोट समुद्रात बुडाल्याने १३ जणांना जलसमाधी मिळाली आहे. या घटनेत १०९ जणांना वाचवण्यात आले आहे. सात ते आठ प्रवाशी अजून बेपत्ता आहे. नौदलाच्या १४ हेलिकॉप्टरच्या माध्यमातून बचावकार्य सुरु आहे. या घटनेत प्रवासी क्षमतेपेक्षा जास्त प्रवाशांना घेऊन निघालेल्या बोटीच्या मालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर मृतांच्या कुटुंबियांना राज्य सरकारने पाच लाखांची मदत जाहीर केली आहे. या घटनेची चौकशी मुंबई पोलीस आणि नौदल करणार आहे.



दरम्यान, मुंबईत गेट ऑफ इंडिया पाहण्यासाठी रोज हजारो पर्यटक येत असतात. त्यातील काही पर्यटक गेट ऑफ इंडिया पहिल्यानंतर एलिफंटा येथील गुफा पाहण्यासाठी जात असतात. एलिफंटाला जाण्यासाठी पर्यटकांना बोटीने प्रवास करावा लागतो. बुधवारी दुपारी पर्यटकांनी भरलेल्या दोन बोटी एलिफंटाच्या दिशेने निघाल्या होत्या. त्यापैकी एका बोटीला नौदलाच्या स्पीड बोटीने जोरदार टक्कर दिली. त्यानंतर बोट उलटली. उलटलेल्या बोटीचे नाव 'नीलकमल' असे आहे. या बोटीमध्ये ११० प्रवासी होते. उरण, कारंजा परिसरात बोट उलटल्याची माहिती पोलिसांनी दिली. माहिती मिळताच, नेव्ही, जेएनपीटी, कोस्टगार्ड, पोलिसांच्या आणि स्थानिक माछीमारांच्या बोटीच्या साहाय्याने बचावकार्य सुरू करण्यात आले. दुर्घटनेची माहिती मिळताच या परिसरातील इतर बोटीही घटनास्थळी दाखल झाल्या. त्यांनी बचावकार्य सुरु केले.

## गेट वे ऑफ इंडियाजवळील बोटीची दुर्घटना दुर्दैवी, दुर्घटनाग्रस्तांना योग्य मदत देणार - मुख्यमंत्री फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** मुंबई येथील गेट वे ऑफ इंडियाहून एलिफंटाकडे जाणारी बोट उलटल्याची घटना अतिशय दुर्दैवी व दुःखद आहे. अंदाजे सात ते आठ जण बेपत्ता आहेत. त्यांचा शोध सुरु आहे. दुर्घटनाग्रस्तांना योग्य मदत करण्यात येईल असे, निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, बोटीतील लोकांना मदत वेळेवर पोहोचल्यामुळे त्यांना वाचवता आले. या घटनेची अधिकची सविस्तर माहिती घेतली जाईल. दुर्घटनाग्रस्तांना योग्य ती मदत दिली जाईल.

## मुंबईतील बोट दुर्घटनेच्या बचावकार्याला वेग देण्याचे; उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** मुंबईत एलिफंटा परिसरात आज सायंकाळी प्रवासी बोट बुडाल्याची घटना घडली असून त्याबाबतच्या बचावकार्याची माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई शहर, रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडून घेतली. नौदल, जेएनपीटी, तटरक्षक दल आणि स्थानिक मच्छीमार बोटींच्या सहाय्याने बचाव कार्याला वेग देण्याचे निर्देश देत सगळ्यांना सुरक्षित बाहेर काढा, असे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यंत्रणेला सांगितले.

एलिफंटाला जाणाऱ्या फेरीबोटीच्या दुर्घटनेची माहिती मिळताच उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे, मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून बचावकार्याची माहिती घेतली. त्याचबरोबर पोलिस उपआयुक्त (बंदरे) सुधाकर पाठारे यांच्याशीही दूरध्वनीवरून संवाद साधत माहिती घेतली.

## नागपूर हिवाळी अधिवेशनाचे कामकाज २१ डिसेंबरपर्यंत : मंत्री चंद्रकांत पाटील यांचे विधानसभेत निवेदन



दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनाचे कामकाज शनिवार, दि.२१ डिसेंबर २०२४ रोजीपर्यंत चालणार असल्याचे निवेदन मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानसभेत केले.

## ठाणेकरांची वाहतूककोंडीतून सुटका होणार, आणखी एक मेट्रो सेवेत येणार, असा असेल प्रकल्प

**मुंबई/प्रतिनिधी :** लवकरच मुंबईकरांना आणखी एक मेट्रो मिळणार आहे. वडाळा ते कासारवडली मेट्रो ४ मार्गिकेवरील एक अवघड टप्प्याचे काम पूर्ण झाले आहे. या मार्गिकेवर चार यू गर्डरची उभारणी करण्यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला यश आलं आहे. यामुळं मेट्रो ४ आणि मेट्रो ५ मार्गिकेवरील स्थानकांचे इंटीग्रेशन सहज शक्य होणार आहे. तसंच, मुंबईकरांना प्रवासाचा आणखी एक पर्याय उपलब्ध होणार आहे.

मेट्रो ४च्या पॅकेज १२ मधील कापूरबावडी मेट्रो स्थानक हे मेट्रो ४ आणि ५ या दोन मेट्रो मार्गिकांचे इंटीग्रेटेड स्थानक आहे. दोन्ही मेट्रो स्थानके एकाच जागी असल्याने त्यांच्या बांधकाम ाचे काम अधिक आव्हानात्मक होते. शनिवारी या स्थानकाच्या भागात चार गर्डरची उभारणी करण्यात आली. कंपनीने ५०० ते ५५० टन क्षमतेच्या दोन अवजड क्रेन्स, गर्डर वाहून नेण्यासाठी ४ मल्टीॲक्सल पुलर, काउंटर वजन वाहून नेण्यासाठी ६ ट्रेलर, ५ मॅन लिफ्टर्स, ४ हायड्रा, २ रुग्णवाहिका नियुक्त केल्या होत्या. रात्री ११ ते सकाळी ७ यावेळेत हे काम पूर्ण करण्यात आले.

वडाळा-घाटकोपर-कासारवडवली या मेट्रो चार या मार्गिकेमुळं ठाणेकरांची वाहतुककोंडीतून सुटका होणार आहे. २०२५ पर्यंत हा प्रकल्प पूर्ण होण्याची शक्यता आहे. तसंच, पहिल्या टप्प्यात घोडबंदर ते मुलुंड दरम्यान मेट्रो धावणार आहे. मेट्रो लाइन ४ म्हणजे वडाळा ते कासारवडवली आणि मेट्रो लाइन ४ अ मध्ये कासारवडवली ते गायमुख अशा मार्गिका तयार करण्यात येणार आहेत. महाराष्ट्र सरकारने या मेट्रो प्रकल्पावर २००६ पासून काम करण्यास सुरुवात झाली आहे.

या दोन्ही मेट्रो मार्गिका पूर्ण झाल्यानंतर २०३१पर्यंत दोन्ही मार्गिकांवर एकाचवेळी १५ लाखाहून अधिक प्रवासी प्रवास करु शकतात. मुंबई मेट्रो महाराष्ट्र सरकारचा महत्त्वकांक्षी प्रकल्प आहे. ही मेट्रो सुरू झाल्यानंतर नागरिकांचा प्रवास अधिक आरामदायी होणार आहे. तसंच, कनेक्टिव्हीटीदेखील मिळणार आहे.

## विरोधी पक्षनेतेपदावरून काँग्रेस – शिवसेनेत दुफळी?



दैनिक आपला विदर्भ

**'मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभेतील विरधी पक्षनेतेपद कोणाकडे जाणार? याबाबत विधिमंडळात चर्चा रंगली आहे. विरोधी पक्षाकडे १० टक्के सदस्य नसल्याने विरोधी पक्षनेतेपद द्यायचे की नाही, हा अध्यक्षांचा अधिकार आहे. संख्याबळानुसार शिवसेना गटाचा त्यावर अधिकार असला तरी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी अद्याप कोणाच्याही नावाचे पत्र अध्यक्षांना पाठविललेले नाही. तर, विधान परिषदेत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचा विरोधी पक्षनेता असल्याने विधानसभेत काँग्रेसला मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. यावर काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

उद्धव ठाकरेंनी काल (१७ डिसेंबर) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. या भेटीत त्यांनी विरोधी पक्षनेतेपदाचा प्रस्ताव ठेवल्याची चर्चा आहे. यावर नाना पटोले म्हणाले, ''शिवसेनेचा आकडा आमच्यापेक्षा मोठा आहे. त्यांचे २० आमदार आहेत, तर आमचे १६. त्यामुळे स्वाभाविक त्यांचं नाव येणारच. पण यावर एकत्र बसून चर्चा हईल, अशी अपेक्षा होतील. पण त्यांनी स्वंतत्र जाऊन चर्चा केली तर काही बोलणार नाही.''

विरोधी पक्षनेतेपदाचा सर्व निर्णय हा विधानसभा अध्यक्षांचा असतो. यामुळे विरोधी पक्षनेतपदी नेमणूक करायची की नाही या सर्वस्वी अधिकार हा नवे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांचा असेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी सल्लामसलत करून नार्वेकर पुढील निर्णय घेतील. उद्या अध्यक्षांनी ठरविल्यास विरोधी पक्षनेत्याची निवड होऊ शकते. कारण राज्यात तसा पायंडा आहे.

उद्धव ठाकरे काय म्हणाले?

विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेतेपद शिवसेनेकडे असल्याने विधानसभेत ते काँग्रेसला मिळावे, असे त्यांच्या ज्येष्ठ नेत्यांना वाटत आहे. पण ठाकरे निर्णय का घेत नाहीत, याचे कोडे असून शपथविधी, विस्तार आणि खातेवाटपाला विलंब झाला. मग आम्ही थोडावेळ घेतला, तर बिघडले कुठे, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी काल पत्रकारांना विचारला.

## 'ज्यांना कारागृहात टाकायला निघाले आता त्यांची गळाभेट कशासाठी ?' : एकनाथ शिंदेंचा उद्धव ठाकरेंवर हल्लाबोल

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणूक २०२४ च्या निकालानंतर विरोधकांनी महायुतीच्या नेत्यांवर मोठी टीका केली आहे. यावर बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभागृहात आपली मतं मांडली पाहिजे. लोकांचे प्रश्न सभागृहात मांडण्यासाठी सभागृह आहे. मात्र बाहेर नौटंकी करायची अन् सभागृहात गप्प बसायचं, असा विरोधकांचा डाव आहे. त्यामुळे विरोधकांनी जनादेशाचा अपमान करू नये, अन्यथा निवडणूक लढवू नये, असा जोरदार हल्लाबोल एकनाथ शिंदे यांनी केला. उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावर एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार टीका केली.

उद्धव ठाकरे देवेंद्र फडणवीस भेटीवरुन हल्लाबोल : उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावर एकनाथ शिंदे यांनी जोरदार हल्लाबोल केला. ''देवेंद्र फडणवीस हे मुख्यमंत्री आहेत, त्यांना कोणीही भेटू शकते. मात्र जेव्हा सत्तेत होते, तेव्हा ज्यांना अटक करुन कारागृहात टाकायला निघाले होते, त्यांनी आता देवेंद्र फडणवीस यांची भेट का घ्यावी, त्यांना काहीच वाटत नाही,'' का असा सवाल त्यांनी यावेळी केला.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे अनावरण

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या नवीन संकेतस्थळाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज येथे अनावरण करण्यात आले. www.home.maharashtra.gov.in या नावाचे अद्ययावत असे संकेतस्थळ आता माहितीजालकावर उपलब्ध झाले आहे.

मुख्यमंत्र्यांच्या रामगिरी शासकीय निवासस्थानी झालेल्या गृह विभागाच्या बैठकीत संकेतस्थळाचे अनावरण झाले. या बैठकीस मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव डॉ. आय. एस. चहल, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी तसेच अन्य विविध विभागांचे अतिरिक्त सचिव, प्रधान सचिव तसेच गृह विभाग,




पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते.

हे नवीन संकेतस्थळ वापरकर्त्यासाठी सुलभ करण्यात आले आहे. या संकेतस्थळावर विविध जलद दुवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. त्यामध्ये महाराष्ट्र कारागृह विभाग, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क (ऑनलाईन सेवा), आपले सरकार, महाराष्ट्र राज्य पोलीस, बृहन्मुंबई पोलीस,महाराष्ट्र सागरी मंडळ, महाराष्ट्र शासन, मोटार वाहन विभाग, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलिस अकादमी, केंद्रीय अन्वेषण ब्युरो, पोलीस संशोधन केंद्र, (सीपीआर) पुणे, गुन्हे अन्वेषण विभाग पुणे, महाराष्ट्र सुरक्षा दल, मुंबई वाहतूक पोलीस, एनजेडीजी । राष्ट्रीय न्यायिक डेटा ग्रिड, देशाच्या सेवेत भारतीय पोलीस, राष्ट्रीय तुरुंग माहिती पोर्टल, ई-प्रोसिक्युशन आदी विभागांचे जलद दुवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

## छगन भुजबळांची नाराजी आम्हाला परवडणारी नाही, गिरीश महाजनांचं मोठं विधान

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झालं. त्यानंतर सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तारही पार पडला. मात्र, मंत्रिमंडळातून अनेक दिग्गज नेत्यांना डावलण्यात आलं. त्यामुळे महायुतीमधील अनेक नेते नाराज असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते छगन भुजबळ यांनाही मंत्रिमंडळातून डावलण्यात आलं. त्यामुळे त्यांनी जाहीर नाराजी बोलून दाखवली. जहां नहीं चैना, वहां नहीं रहना, असं सूचक विधानही छगन भुजबळ यांनी केलं होतं.

त्यानंतर आज छगन भुजबळ यांनी कार्यकर्त्यांशी संवाद साधत खदखद व्यक्त केली. आता भुजबळांची नाराजी दूर करण्यासाठी राष्ट्रवादीचे नेते त्यांची



भेट घेण्याची शक्यता आहे. दरम्यान, भुजबळांच्या नाराजीबाबत बोलताना भारतीय जनता पक्षाचे नेते गिरीश महाजन यांनी मोठं विधान केलं आहे. छगन भुजबळांची नाराजी आम्हाला परवडणारी नाही, असं गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे. त्यामुळे आता महायुतीमधील काही नेते भुजबळांची भेट घेतात का? तसेच त्यांची नाराजी दूर करण्यात येणार का? हे आता पुढच्या काही दिवसांत पाहायला मिळेल.

माझे आणि छगन भुजबळ यांचे कौटुंबिक संबंध आहेत. भुजबळ हे एक मोठे नेते आहेत. राज्यातील ओबीसीचा मोठा चेहरा म्हणजे भुजबळ आहेत. ते महायुतीत वरिष्ठ नेते आहेत. त्यामुळे त्यांची नाराजी आम्हाला परवडणारी नाही ही गोष्ट खरी आहे. त्यांच्याशी काल आणि परवा देखील मी बोललो. आता दोन दिवसांनी मी पुन्हा नाशिकला जाणार आहे. तेव्हा मी त्यांची भेट घेणार आहे. छगन भुजबळ हे महायुती सोडणार नाहीत. त्यांनी महायुती सोडणं हे आम्हालाही परवडणारं नाही. कारण राज्यातील ओबीसींचे ते मोठे नेते आहेत हे सर्वांना मान्य करावं लागेल, असं गिरीश महाजन यांनी म्हटलं. ते साम टिव्ही या वृत्तवाहीनीशी बोलत होते.

मी आमदार होणं किंवा मंत्री होणं हे माझं काम नाही. मला मंत्रिपदाची हाव असती तर मी १६ नोव्हेंबरला राजीनामा देऊन १७ नोव्हेंबरला आलो नसतो. मी राजीनामा दिला होता पण उल्लेख केला नाही कारण मला तसे फोन सारखे येत होते. मी राजीनामा दिला होता हे मी अडीच महिन्यांनी सांगितलं. माझ्याविरोधात अर्वाच्य बोललं गेलं तेव्हा मी सांगितलं. प्रश्न फक्त मंत्रिपदाचा नाही तर अस्मितेचा आहे. एखाद्या समाजाला बरोबर घेऊन लढणारी माणसं आपल्याकडे आहेत. कुणीही दुःखात राहण्याचं कारण नाही. कभी डर न लगा मुझे फासला देखकर, मै बढता गया रास्ता देख कर, खुदही खुद नजदिक आती गयी मंजिल मेरा बुलंद हौसला देखकर, असं छगन भुजबळ यांनी आज कार्यकर्त्यांशी बोलताना म्हटलं.

मंत्रिपद मिळालं नाही तरीही मी रस्त्यावर आहे. अवहेलनचं शल्य मनात आहे. मी तुम्हा सगळ्यांशी चर्चा करुन पुढचं पाऊल उचलणार आहे. विचारपूर्वक निर्णय घेन. मै मौसम नहीं जो पल में बदल जाऊं, मै उस पुराने जमाने का सिक्का हूँ, ऐसेही फेक न देना तुम्हारे बुरे वक्तमें, असंही छगन भुजबळ यांनी म्हटलं.

## गोवा मुक्ती दिन

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वातंत्र्य झाला. दीडशे वर्ष राज्य करून इंग्रज भारतातून निघून गेले. संपूर्ण देशात स्वातंत्र्याची पहाट उगवली पण भारतातील एक छोटेशे निसर्गरम्य बेट असलेले गोवा मात्र पारतंत्र्यातच होते. गोव्यावर पोर्तुगीजांची सत्ता होती. १५१० मध्ये पोर्तुगीजांनी गोव्यात पाय ठेवला तेंव्हापासून गोमंतकीय जनतेचे नष्टचर्य सुरू झाले होते. तब्बल साडेचारशे वर्ष पारतंत्र्यात राहिलेल्या गोव्याचे नष्टचर्य १९ डिसेंबर १९६१ रोजी संपले. १९६१ च्या युद्धानंतर भारतभूमीवरील उरलेसुरले पोर्तुगीज अधिपत्य समाप्त झाले, तसेच गोवा, दमन व दीव हा प्रदेश मुक्त झाला. कोकण पासून पेडणेपर्यंत पसरलेली गोव्याची निसर्गरम्य भूमी १९ डिसेंबर १९६१ रोजी भारताशी एकरुप झाली अर्थात १९६१ चे युद्ध हा गोवामुक्ती आंदोलनाचा निर्णायक भाग होता पण गोवा मुक्ती आंदोलनाला खूप मोठा इतिहास आहे. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देश स्वातंत्र्य झाल्यानंतर देशातील ५६५ संस्थाने भारतात विलीन झाले पण पोर्तुगीजांनी गोवा, दीव, दमन, दादरा आणि नगरहवेली या आपल्या वसाहतीतुन जाण्यास स्पष्ट नकार दिला. ते गोव्याचे भारतात विलीनीकरण करण्याच्या बाजूने नव्हते. पंतप्रधान पंडित नेहरु हे पोर्तुगीज वसाहतीशी चांगले संबंध प्रस्थापित करीत होते पण तेथील प्रशासक मात्र त्यांना सहकार्य करीत नव्हते. गोमंतकीय जनताही पोर्तुगीजांच्या अत्याचाराला कंटाळून भारतात विलीन होण्यासाठी भारत सरकारने सहकार्य करावे अशी मागणी करीत होते. पोर्तुगीज गोव्याला भारतात विलीन करण्याच्या विरोधात होते पण जनतेला मात्र भारतात विलीन व्हावे असे वाटत होते. गोमंतकीय जनतेची इच्छा ओळखून पंतप्रधान नेहरू यांनी संयुक्त राष्ट्र संघाच्या माध्यमातून पोर्तुगीजांवर दबाव आणला. शांततेच्या मार्गाने भारत सोडून जाण्याचा संदेश त्यांनी पोर्तुगीजांना दिला पण पोर्तुगीजांनी या संदेशाला जुमानले नाही. शांततेच्या मार्गाने पोर्तुगीज देश सोडून जात नाहीत, वाटाघाटी यशस्वी होत नाहीत हे लक्षात आल्यावर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरुंनी लष्कराला कारवाईचे आदेश दिले. भारताने लष्करी कारवाई करू नये म्हणून पोर्तुगीजांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. पोर्तुगीज सरकारची जुलूमशाही आणि आंदोलनाला मिळणारा जनतेचा तीव्र प्रतिसाद या पार्श्र्वभूमीवर नेहरुंनी १७ डिसेंबर १९६१ रोजी आंतरराष्ट्रीय दबावाला न जुमानता भारतीय सैन्य गोव्यात घुसवण्याचा निर्णय घेतला. भारतीय सैन्याने पोर्तुगिजांचा पूर्ण पाडाव करुन १९ डिसेंबर १९६१ रोजी गोव्यात तिरंगा फडकवला आणि गोवा मुक्त झाला. साडेचारशे वर्ष पारतंत्र्यात असणाऱ्या गोव्यात स्वातंत्र्याची पहाट उगवली. दीव, दमन आधीच मुक्त झाले होते. या तिघांना मिळून केंद्र सरकारने केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा दिला. नंतर १९६७ साली सार्वमताने गोवा घटक राज्य म्हणून घोषित झाले. पोर्तुगिजांच्या गुलामीतून मुक्त होऊन आज गोव्याला तब्बल ६३ वर्ष पूर्ण झाली. गोवा मुक्ती संग्रामाचे हे ६३ वे वर्ष आहे. यानिमित्ताने गोव्यात विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाणार आहे. गोवामुक्ती दिनाच्या गोमंतकीय जनतेला मनापासून शुभेच्छा!

# पिरपहाडी दर्गा येथे विकास कामाचे माजी आ. संजय रायमुलकर यांच्या हस्ते भूमिपूजन

**दैनिक आपला विदर्भ**





**मेहकर/प्रतिनिधी :** जानेफळ मार्गावरील पीर पहाडी दर्गा येथील २५ लाख रुपये खर्चाच्या विकास कामाचे भूमिपूजन माजी आमदार संजय रायमुलकर यांच्या हस्ते करण्यात आले. हाजी साहेब पठाण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

पीर पहाडी दर्गा येथे भाविकांच्या मागणीनुसार २५ लाख रुपयांचे काम माजी आमदार संजय रायमुलकर यांनी मंजूर करून देऊन निधी उपलब्ध करून दिलेला होता.काल ता.१७ रोजी सदर विकास कामाचे भूमिपूजन करण्यात आले. यावेळी झालेल्या कार्यक्रमात बोलतांना हाजी साहेब पठाण म्हणाले की ,मतदार संघातील मुस्लिम बांधवांच्या सोयीसाठी संजय रायमुलकर यांनी मोठ्या प्रमाणात निधी दिलेला आहे. त्यातून शादीखाने, कबरस्तान संरक्षण भिंती, रस्ते आदी कामे करण्यात आली. ते जरी निवडणुकीत थोड्या मतांनी पराभूत झाले असले तरी आमच्या मनात नेहमीसाठी तेच आमदार आहेत. माजी नगरसेवक तौफिक कुरेशी म्हणाले की, शहर आणि ग्रामीण भागात संजय रामुलकर यांनी मोठ्या प्रमाणावर विकास कामे मंजूर करून आणली आहेत, त्याचे श्रेय त्यांचेच आहे अशा कामांमध्ये इतरांनी ढवळाढवळ करू नये. त्यांनी नवीन कामे आणावीत आणि विकास करावा.

यावेळी मार्गदर्शन करताना संजय रायमुलकर म्हणाले की, केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून चार हजार कोटी पेक्षा जास्त विकास कामे मेहकर लोणार तालुक्यात मंजूर करून आणली आहेत. आचारसंहिता लागल्याने बऱ्याच कामांना आरंभ करता आला नाही. आता त्या कामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण आम्ही करणार आहोत. सध्या राज्यात महायुतीचेच कार्यक्षम सरकार असल्याने यापुढेही मेहकर लोणार तालुक्यात मोठ्या प्रमाणावर मी विकास कामे आणणार आहे. आम्ही मंजूर करून आणलेल्या विकास कामांचे श्रेय इतरांनी घेऊ नये. त्यांनी नवीन कामे मंजूर करून आणावीत. यावेळी शिवसेनेचे शहर प्रमुख जयचंद बाठीया व इतरांची भाषणे झाली. याप्रसंगी रविराज रहाटे, रामेश्वर भिसे, समाधान सास्ते, हर्षल गायकवाड, समीरखान ,सलीम कुरेशी, खालील कुरेशी, अमीरभाई, फिरोज अत्तार, शेख सलमान, अलीमखान, हुसेन कुरेशी, वसीमशेख ,कलीम शेख, जाकीर कुरेशी, रईस कुरेशी ,चांद कुरेशी, राजेकअली यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# प्रेक्षकांना खळखळून हसवताना हा अभिनेता बनला खलनायक, तेव्हा चित्रपटाने केली बजेटच्या ४ पट कमाई

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलीवूडमध्ये असे अनेक स्टार्स आहेत, जे स्वत:ला कोणत्याही भूमिकेशी उत्तम प्रकारे जुळवून घेतात. विनोदी भूमिका असो की गंभीर भूमिका, प्रत्येक भूमिकेत अगदी फिट बसणाऱ्या अशा स्टार्समध्ये रितेश देशमुखचे नाव सामील आहे. त्याने अनेक चित्रपटांमध्ये अशी व्यक्तिरेखा साकारली आहेत, जी वेगळ्याच पातळीवर गेली आहेत. रितेशने २००३ मध्ये त्याच्या बॉलिवूड करिअरची सुरुवात केली, तरीही त्याला त्यावेळी खूप अडचणींचा सामना करावा लागला होता.

रितेश देशमुख १७ डिसेंबर रोजी त्याचा ४६ वा वाढदिवस साजरा करत आहे, अशा प्रसंगी त्याच्या आतापर्यंतच्या चमकदार कारकिर्दीबद्दल बोलणे स्वाभाविक आहे. रितेशने केवळ हिंदी चित्रपटसृष्टीतच नाही तर मराठी चित्रपटसृष्टीतही आपल्या अष्टपैलू अभिनयाने लोकांची मने जिंकली आहेत. अभिनयात येण्यापूर्वी त्याला वास्तुविशारद व्हायचे होते, पण नशिबात काही वेगळेच होते. रितेशसाठी सुरुवातीचा काळ खूप कठीण होता, कारण तो राजकीय कुटुंबातून आला होता.



रितेश देशमुख याचे वडील दिवंगत विलासराव देशमुख हे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री होते. राजकीय घराण्यातील असल्यामुळे त्याच्या अभिनय कारकिर्दीवर खूप दबाव होता. २००३ मध्ये त्याने 'तुझे मेरी कसम'मधून बॉलिवूडमध्ये पदार्पण केले. मात्र, काही काळानंतर त्याच्या उत्कृष्ट अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकली. 'मस्ती', 'क्या कूल हैं हम', 'मालामाल वीकली', 'हे बेबी', 'हाऊसफुल' यांसारख्या अनेक चित्रपटांमध्ये काम करून त्याने आपली खास ओळख निर्माण केली.

मोठ्या पडद्यावर खलनायकाची भूमिका साकारताना त्याचा अभिनय पाहून लोकांना आश्र्चर्य वाटले. रितेश अनेकदा कॉमेडी भूमिकांमध्ये दिसतो, पण २००४ मध्ये जेव्हा एक था व्हिलन रिलीज झाला, तेव्हा लोक त्याच्या अभिनयाचे कौतुक करताना थकले नाहीत. या सिद्धार्थ मल्होत्रा आणि श्रद्धा कपूर स्टारर चित्रपटात रितेशने सायको किलरची भूमिका साकारली होती, जी लोकांना खूप आवडली होती. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर बजेटपेक्षा ४ पट अधिक कमाई केली होती.

## आजपासून सुशासन सप्ताह; नागरिक दाखल करू शकतात आपल्या तक्रारी

**दैनिक आपला विदर्भ**

**नांदेड/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांसंदर्भात सामान्य नागरिकांना माहिती व्हावी तसेच यासंदर्भात नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी केंद्रीय सार्वजनिक तक्रार निवारण व निवृत्तीवेतन विभागामार्फत उद्यापासून सुशासन सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहनिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. जिल्हा प्रशासनामार्फत यासंदर्भात देण्यात आलेल्या निर्देशानुसार १९ ते २४ डिसेंबर या कालावधीत सर्व कार्यालयाने सुशासन सप्ताह साजरा करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



नागरिकांच्या तक्रारीचे निराकरण करणे, त्यांना सुलभ सेवा पुरविणे, जिल्हा, उपविभाग, तहसिल स्तरावरील योजनांची कालबद्ध अंमलबजावणी करणे. याबाबत शिबीर आयोजित करण्याचे केंद्रीय विभागाने सुचविले असून जिल्ह्यामध्ये त्याची अंमलबजावणी करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

सदर शिबिरामध्ये नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण, आपले सरकारसह विविध पोर्टलवर प्राप्त तक्रारीचे निराकरण, ऑनलाईन देण्यात येणाऱ्या सेवांचा वेळेत निपटारा करणे, सेवा देण्याकरीता ऑनलाईन प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करणे आदी निर्देश देण्यात आले आहेत.

त्यामुळे १९ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या या आठवड्यात आयोजित विविध शिबिरांमध्ये नागरिकांनी मोठ्यासंख्येने सहभागी होण्याचे आवाहन जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून ज्येष्ठ समीक्षक डॉ सुधीर रसाळ यांचे अभिनंदन

## समीक्षा क्षेत्रातील व्रतस्थ साहित्यिकाचा सन्मान

**दैनिक आपला विदर्भ**

**नागपूर/प्रतिनिधी :** साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ज्येष्ठ समीक्षक डॉ सुधीर रसाळ यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले आहे. या पुरस्कारामुळे मराठी समीक्षा क्षेत्रातील एका व्रतस्थ साहित्यिकाचा सन्मान होत आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला आहे.

भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या राष्ट्रीय साहित्य संस्थेच्यावतीने साहित्य अकादमी पुरस्काराची घोषणा करण्यात आली. यात डॉ रसाळ यांच्या 'विंदांचे गद्यरूप' या समीक्षात्मक पुस्तकाला हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

शुभेच्छा संदेशात मुख्यमंत्री म्हणतात, डॉ रसाळ यांचे मराठी साहित्य विश्र्वातील योगदान अमुल्य असे आहे. मराठी भाषेचे अध्यापन, संशोधन, संपादन आणि समीक्षा असा त्यांचा चौफेर विहार राहीला आहे. विशेषतः त्यांचे मराठी काव्यविषयक संशोधनात्मक लेखन मौलिक असे आहे. समीक्षेतून कठीण विषय सहज–सुलभपणे समजावून देणारी त्यांची शैली नवोदितांना आश्र्वासक वाटते, यातच त्यांचे मोठेपण आहे. मराठी भाषा जतन, संवर्धन तसेच साहित्य विषयक चळवळीतील संस्था, समित्यांवरही डॉ रसाळ सक्रीयपणे कार्यरत आहेत. त्यांच्या समीक्षात्मक लेखनाला राष्ट्रीयस्तरावर मिळालेली ही दाद नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. डॉ. रसाळ आजही तितक्याच तडफेने लेखन, संशोधनात कार्यरत आहेत. त्यांच्या हातून यापुढेही मराठी साहित्याची अशीच अखंडित सेवा घडत राहो. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो या शुभेच्छांसह मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी डॉ. रसाळ यांचे अभिनंदन केले आहे.




DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# अधिक सक्षम होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक - प्रधान सचिव ब्रिजेश सिंह




- नागपूर प्रेस क्लब येथे पत्रकारांसाठी विशेष व्याख्यान
- आपली पत्रकारिता 'रिअलटाईम' करण्यासाठी 'एआय' उपयुक्त

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** माध्यमात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तिला अधिक माहिती सक्षम होण्याचा मार्ग कृत्रिम बुद्धिमत्तेने म्हणजेच 'एआय' ने उपलब्ध करून दिला आहे. आपल्या मातृभाषेतून मिळणा-या ज्ञानाला ज्या मर्यादा होत्या, त्या मर्यादा आता 'एआय' च्या माध्यमातून कमी झाल्या आहेत. ज्या भाषेत आपल्याला माहिती हवी आहे, त्या भाषेत ती सहजरित्या उपलब्ध होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेपासून दूर राहण्याऐवजी तंत्रज्ञान समजून घेणे आणि आपल्या वापरातून ते अधिक परिपूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

नागपूर प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक नागपूर कार्यालयाच्या वतीने 'आर्टिफिशल इंटेलिजन्स इन जर्नालिझम' (कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता) या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

ज्येष्ठ पत्रकार तथा माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर - अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, माहिती संचालक किशोर गांगुर्डे, दयानंद कांबळे उपस्थित होते.

श्री. ब्रिजेश सिंह म्हणाले, कोणतेही नवीन तंत्रज्ञान आले की नोक-या कमी होतील, अशी एक भीती व्यक्त होत असते. मात्र तंत्रज्ञानातून नवनवीन संधी निर्माण झाल्याची प्रचिती आपण आजवर घेत आलो आहोत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही अशीच भीती व्यक्त केली जात आहे. वास्तविक याचा परिपूर्ण वापर जर करता आला नाही, तर संबंधितांना आपल्या नोक-या गमाविण्याची भीती अधिक आहे. हे माध्यम वापरतांना मात्र प्रत्येकाला अगोदर स्वत:ला सिध्द करावे लागेल. एआयच्या माध्यमातून जी काही माहिती आपल्यासमोर येईल, त्या माहितीला अधिक पडताळून घेणे, त्यात असलेल्या त्रृट्या दुरूस्त करून अधिक परिपूर्ण करणे, अशा माहितीला नैतिक व संवैधानिक दृष्टीने पडताळून पाहणे व दक्ष राहून चुका दुरुस्त करणे, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा इशाराही त्यांनी यावेळी बोलतांना दिला.

आज विविध समाजमाध्यमांचा लोकांवर प्रचंड प्रभाव आहे. यात अनेक धोके आहेत. एखादी व्यक्ती गाफील राहून आपल्या मोबाईलवर आलेल्या चुकीच्या संदेशाला बळी पडला तर त्याला आर्थिक फसवणुकीलाही तोंड द्यावे लागते, याची अनेक उदाहरणे आहेत. यातील भीती बाजुला सारून आपण दक्ष असायला हवे. इतर प्राणीमात्रांबद्दल व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून ज्या मानवतेच्या दृष्टीने आपण त्यांना पाहतो, त्याच दृष्टीमध्ये संवैधानिक व सत्य -असत्य या परिभाषेत सावध होत 'एआय' ला आपण जवळ केले पाहिजे. कोणतीही उत्सुकता ही ज्ञानाच्या स्त्रोतांपर्यंत आपल्याला घेऊन जात असते. पुर्वी या उत्सुकतेला आपण गुगलची जोड देऊन समाधान करून घेतले. आता या उत्सुकतेचे अधिक पुढचे पाऊल म्हणून एआय मार्फत मिळणा-या माहितीकडे पाहावे लागेल, असे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे म्हणाले, आपल्यामध्ये मुळात असलेल्या गुणवत्तेसोबतच कृत्रीम बुध्दीमत्तेचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. भारत विरोधी कृत्य करण्यासाठी एआय चा वापर होणार नाही, यासाठी एआय ची माहिती भारतीय पध्दतीने तयार करणे आवश्यक आहे. मराठी भाषेलासुध्दा एआय शी जोडावे लागणार आहे. तसेच अशा कार्यशाळांचे अधिकाधिक आयोजन व्हावे, अशी अपेक्षाही राहुल पांडे यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र यांनी केले. संचालन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी तर आभार माहिती संचालक दयानंद कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार बाळ कुलकर्णी, धमेंद्र झोरे, भुपेंद्र गणवीर यांच्यासह विविध माध्यमातील पत्रकार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच राज्यातील जिल्हा माहिती कार्यालये आणि विविध पत्रकारिता संस्थांनी ऑनलाईन पध्दतीने व्याख्यानाचा लाभ घेतला.

## परभणी प्रकरणाचा उच्चस्तरीय, नि:पक्षपाती आणि स्वतंत्र तपास करा; एमपीजे संघटनेची मागणी

### मुख्यमंत्री यांना दिले निवेदन



दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड/प्रतिनिधी :** मुव्हमेन्ट फॉर पिस ॲन्ड जस्टीस फॉर वेलफेयर या संघटने तर्फे १० डिसेंबर रोजी परभणीमध्ये संविधानाच्या प्रतिकृतीला क्षतिग्रस्त करने, त्यानंतरच्या हिंसक घटना आणि सोमनाथ सूर्यवंशी यांचा दुःखद मृत्यू च्या संबंधाने मा मुख्यमंत्री यांना उपविभागीय अधिकारी मार्फत निवेदन देण्यात आले .

निवेदनात परभणी प्रकरणाचा उच्चस्तरीय, निःपक्षपाती आणि स्वतंत्र तपास करणे , पारदर्शकता आणि उत्तरदायित्व - तपास प्रकिया पूर्णपणे पारदर्शक असावी या प्रकरणी सरकार ने न्याय मिळवून द्यावा, शांतता आणि सौहार्द प्रस्थापित आणि एकोपा पूर्ववतकरण्यासाठी त्वरित आणि प्रभावी पावले उचलावीत .सर्व संबंधितांनी पक्षांशी संवाद सुरू करावा जेणेकरून विश्र्वासाचे वातावरण निर्माण होईल आणि या संवेदनशिल समस्येवर शांततापूर्ण तोडगा काढता येईल , संविधानाची सुरक्षा -संविधानाच्या प्रतिकृतीला हानी पोहोचणाऱ्या घटनेची सखोल चौकशी करण्यात यावी .या घटनेमागील परिस्थिती आणि जबाबदार व्यक्तीचा शोध घ्यावा जेणेकरून भविष्यात अशा दुर्दैवी घटनांना आळा बसेल. अश्या आशयाच्या मागणीचे निवेदन मा मुख्यमंत्री यांना देण्यात आले.

निवेदन देतांना संघटनेचे जिल्हाध्यक्ष फेरोज अन्सारी, सुनिल चिंचोलकर, उत्तम बरवड, देवानंद मोरे, रेखाताई गायकवाड, स्वरांजली वाघमारे ,रसुल पटेल, प्रा गजानन दामोदर, मोहसीन राज, सैय्यद रजा , डॉ फारुक अबरार, समीर अहेमद, सिध्देश्र्वर दिवेकर, संजय मोरे, राहुल सुर्य साहेबराव कदम, वैशाली कवडे, मिनाज अहेमद, तस्लीम अहेमद, अन्सार हुसैनी ,मोनिका भगत आदी उपस्थित होते.

## बदलापूर पूर्व पोलिसांनी अट्टल चैन स्नॅचरला ठोकल्या बेड्या



**कल्याण/प्रतिनिधी :** बदलापूर पूर्व पोलिसांनी एका अट्टल चेन स्नॅचरला अटक केली असून त्याच्याकडून बदलापूरमधील चेन स्नॅचिंगच्या ५ गुन्ह्यांची उकल झाली आहे. हा चोरटा युट्युबवर चेन स्नॅचिंग कशी करावी? याचे व्हिडीओ बघून चेन स्नॅचिंग शिकल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.बदलापूर पूर्व आणि पश्र्िचम पोलीस ठाण्याच्या हद्दीत मागील काही दिवसात चेन स्नॅचिंगचे सलग ५ गुन्हे घडले होते. त्यामुळे पोलिसांकडून आरोपीचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू होते. अशातच बदलापूर शहरात संशयास्पदरित्या फिरणाऱ्या एका इसमाला पोलिसांनी पाठलाग करून ताब्यात घेतलं. त्याची चौकशी केली असता त्याने आपणच चेन स्नॅचिंगचे ५ गुन्हे केल्याची कबुली पोलिसांना दिली.

या चोरट्याचं नाव प्रवीण प्रभाकर पाटील असं असून तो कर्जत जवळच्या शेलू इथं राहणारा आहे. प्रवीण याच्यावर आधी कर्जत तालुक्यात हत्येच्या प्रयत्नाचा एक गुन्हा दाखल आहे. त्यानंतर झटपट पैसे कमावण्याच्या उद्देशाने युट्युबवर चेन स्नॅचिंग कशी करावी? याचा व्हिडिओ त्याने पाहिला आणि त्यानंतर बदलापूर शहरात एकटाच येऊन तो चेन स्नॅचिंग करू लागला. मात्र अखेर बदलापूर पूर्व पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण बालवडकर आणि गुन्हे पोलीस निरीक्षक राजेश गजल यांच्या मार्गदर्शनाखालील टीमने प्रवीण पाटील याला बेड्या ठोकत त्याच्याकडून पाच गुन्ह्यांची उकल केली.

पोलीस उपनिरीक्षक गोविंद चव्हाण, प्रशांत थिटे, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक राजाराम कुकले, हवालदार विजय गिरीगोसावी, जगदीश म्हसकर, सुधाकर वरखंडे, कृष्णा पाटोळे, कुणाल शिर्के, पोलीस नाईक विनोद नेमाणे, शिपाई महादेव पिसे यांचा या टीममध्ये समावेश होता. पोलिसांनी या गुन्ह्यांमध्ये चोरीला गेलेलं साडेचार तोळे सोनं देखील हस्तगत केल्याची माहिती उल्हासनगरचे पोलीस उपायुक्त सचिन गोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या पत्रकार परिषदेला सहाय्यक पोलीस आयुक्त शैलेश काळे हे देखील उपस्थित होते. चोरट्याच्या या नव्या आयडियामुळे पोलीस देखील चक्रावून गेले आहेत.

### अल्पसंख्याक हक्क दिन उत्साहात संपन्न

# स्वत:च्या हक्क रक्षणासाठी जागरुक असावे

### निवासी उपजिल्हाधिकारी जयश्री ठाकरे

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शासन अल्पसंख्यांक समाजासाठी विविध योजना राबवित असून या योजनाचा लाभ अल्पसंख्यांक समाजातील सर्व नागरिकांना होण्यासाठी जनजागृती होणे गरजेचे आहे. यासाठी अल्पसंख्याकांनी शिक्षणाचे महत्व समजून स्वत:च्या हक्क रक्षणासाठी जागरुक असले पाहिजे. अल्पसंख्याकांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रशासनासह नागरिकांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे यांनी आज येथे केले.

संयुक्त राज्य संघटनेने १८ डिसेंबर, १९९२ रोजी राष्ट्रीय, वांशिक, धार्मिक आणि भाषिक अल्पसंख्यांकांच्या हक्काचा जाहीरनामा स्विकृत करुन प्रस्तुत केला होता. त्याकरीता दरवर्षी १८ डिसेंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय अल्पसंख्यांक हक्क दिवस म्हणुन सर्वत्र साजरा केला जातो. तसेच अल्पसंख्यांक समाजास त्यांच्या घटनात्मक आणि कायदेशीर हक्काची जाणीव व माहिती व्हावी याकरीता अल्पसंख्यांक विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी देखील १८ डिसेंबर हा दिवस 'अल्पसंख्यांक हक्क दिवस' म्हणून आयोजित करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयातील जिजाऊ सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्याक्रमाला जिल्हा नियोजन अधिकारी राहुल पवार, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता कार्यालयाचे सहायक आयुक्त ग.प्र. बिटोडे, सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे शाखा व्यवस्थापक कौस्तुभ हिवाळे, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक ज्योती हिवाळे,




इंटरनॅशलन ह्युमन राईट कमिशनचे राज्याध्यक्ष एस.पी.हिवाळे, सामाजिक कार्यकर्त अरविंद सैतवाल, समुदायातील विविध संघटनांचे प्रतिनिधी, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

आपल्या संबोधनात डॉ. जयश्री ठाकरे म्हणाल्या की, सर्व अल्पसंख्याक समुदाय आपल्या हक्कांबाबत जागरुक राहून मुख्य प्रवाहात सामिल होतील त्यादृष्टीने आपण प्रयत्न केले पाहिजे. तसेच शासनाव्दारे अल्पसंख्याकांच्या समस्यांचे तातडीने निराकरण करुन त्यांच्या विकासासाठी राबवित असलेल्या योजना प्रत्यक्ष त्यांच्यापर्यंत पोहोचेल याकरीता प्रशासन सर्वतोपरी प्रयत्न करेल, असे प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

सहभागी वक्त्यांनी अल्पसंख्याक समुदायांच्या विकासासाठी शासनाने तयार केलेल्या योजना सर्व घटकांपर्यंत पोहोचविण्यासाठी विविध माध्यमाचा वापर करुन प्रशासनाने तसेच अल्पसंख्याक समुदायातील सर्व घटकांनी मिळून प्रयत्न करावे. तसेच अल्पसंख्याकांनी आपले अधिकार जाणून आपला विकास व देशाप्रती कर्तव्य पुर्ण करावेत, असे मत मांडले.

उर्दु ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थांनी देशभक्तीपर गीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर अल्पसंख्याक हक्क दिनाचे महत्व, घटनात्मक अधिकाराबाबत विद्यार्थ्यांनी भाषन केले. यावेळी विविध स्पर्धेत प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचे स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कृषी समृद्धी मल्टीपर्पज फाऊंडेशनचे अध्यक्ष महेंद्र सोभागे यांनी केले.

## महत्त्वाचे...


### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या वक्तव्या विरोधात ठाण्यात राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी संविधानावरील चर्चेदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केलेल्या विधानाचा विरोधकांकडून जोरदार निषेध केला जात आहे. ठाण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या युवक काँग्रेसने देखील अमित शाह यांच्या वक्तव्याचा जोरदार निषेध केला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी याबद्दल माफी मागावी अशी मागणी करत ठिय्या आंदोलन केले आहे. यावेळी अमित शाह यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

### विक्रीसाठी आणलेल्या अवैध सोनोग्राफी मशीनवर आरोग्य विभाग आणि पोलिसांची संयुक्त कारवाई



दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** जालन्यात अवैध गर्भलिंग निदान करण्यासाठी विक्रीला आणलेले सोनोग्राफी मशीन जप्त करण्यात आलं आहे. आरोग्य विभाग आणि पोलिसांच्या वतीने ही संयुक्त कारवाई करण्यात आली आहे. शहराजवळील राजूर चौफुली भागातील आरोपीच्या घरात ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत पोलिसांनी ३ जणांना अटक केली असून सोनोग्राफी मशीन जप्त करण्यात आली आहे. शहरातील राजूर चौफुली भागात गर्भलिंगनिदान करणारी सोनोग्राफी मशीन विक्रीसाठी आणण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य विभागाला मिळाली होती. या माहितीवरून आरोग्य विभाग आणि पोलिसांनी राजूर चौफुली भागात संयुक्त धाड टाकली. या धाडीत ही मशीन आढळून आली असून ३ जणांना अटक करण्यात आली तर विक्रीसाठी आणण्यात आलेली मशीन जप्त करण्यात आलीय दरम्यान पोलिसांनी या प्रकरणी तपास सुरु केला आहे.

### कचरा संकलन करणाऱ्या रेड्डी कंपनीच्या कामगारांना १ मार्च २०२५ पासून किमान वेतन मिळणार



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** शहरात डोअर टू डोअर कचरा संकलनासाठी नेमलेल्या रेड्डी कंपनीच्या कामगारांना किमान वेतन देण्याबाबतचे लेखी पत्र घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख रवींद्र जोगदंड यांनी दिल्यानंतर कामगारांनी काम बंद आंदोलन मागे घेतले आहे. महापालिकेने पी. गोपीनाथ रेड्डी कंपनीला फेब्रुवारी २०२६ पर्यंत कचरा संकलनाचे कंत्राट दिलेले आहे. कंपनीने यासाठी ११०० सफाई कामगारांसह झोनल व सुपरवायझर नेमले आहेत. कंपनी कामगारांना किमान वेतन देत नसल्याने कामगारांनी १६ डिसेंबरपासून काम बंद आंदोलन करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मनपा उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन विभागाचे प्रमुख रवींद्र जोगदंड यांनी रेड्डी कंपनीचे अधिकारी व कामगारांची बैठक घेतली. त्यात काही अटी टाकून कंपनीने १ मार्च २०२५ पासून किमान वेतन देण्याचे मान्य केले. यानंतर लढ्याला यश आल्यामुळे कामगारांनी गुलाल उधळत जल्लोष साजरा केला आहे.

### लोकसभा उमेदवारांची आज खर्चाच्या पुनर्मेळाची बैठक

**नांदेड/प्रतिनिधी :** लोकसभा निवडणुकीमध्ये सहभागी झालेल्या उमेदवारांना खर्चाचा पुनर्मेळ बैठकीसाठी उद्या जिल्हा प्रशासनाने अंमत्रित केले आहे. शंकरराव चव्हाण नियोजन भवन सभागृहात आज १९ डिसेंबर रोजी यासंदर्भात बैठक होत असून उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

आज सकाळी १० ते १२ याकालावधीत ही बैठक होणार असून अनुपस्थित राहणाऱ्या उमेदवार हे भारत निवडणूक आयोगाने निर्गमीत केलेल्या परिपत्रकानुसार निर्धारीत कार्यवाहीस पात्र असतील याची नोंद घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. खर्चासंदर्भातील आवश्यक अनुपालन न करणाऱ्या उमेदवार १९५१ च्या लोकप्रतिनिधित्व अधिनियमातील कलमानुसार ३ वर्षाच्या कालावधीसाठी अपात्र ठरू शकतात. त्यामुळे जबाबदारीने ही प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत राऊत यांनी केले आहे.

## विविध वृत्त...

## परभणी घटनेच्या निषेधार्थ शिवसेना ठाकरे गटाचा धुळ्यात कॅण्डल मार्च




दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** परभणी येथे संविधान शिल्पाची तोडफोडीच्या घटनेनंतर दगडफेक व तोडफोड केल्याप्रकरणी काही आंबेडकरी चळवळीतील आंदोलक युवक कार्यकर्त्यांना परभणी पोलिसांनी कॉम्बिन ऑपरेशन राबवू अटक करून न्यायालयीन कोठडी ठोठावण्यात आली होती. यात आंबेडकरी आंदोलनकर्त्या सोमनाथ सूर्यवंशी याचा पोलीस कोठडीतच मृत्यू झाला. या घटनेचे संपूर्ण महाराष्ट्रात पडतात उमटत आहे.

आज धुळे शहरातील शिवतीर्थ चौक येथून शिवसेना साखरे गटाच्या वतीने कॅण्डल मार्च चे आयोजन करण्यात आले होते. हा कॅन्डल मार्च शहरातील विविध भागातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती स्मारकावर याचा समारोप करण्यात आला. यावेळी शिवसेनेचे माजी आमदार अनिल गोटे यांनी भाजपाचा चांगलाच खरपूस समाचार घेतला. यावेळी त्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केलेल्या वक्तव्यावर टीका करत अमित शहा यांच्या पोटात जे होत तेच होटावर आलं. अमित शहा तुम्ही देखील आंबेडकर आंबेडकर करा तुम्हाला स्वर्ग तरी नशीब होईल अशी टीका त्यांनी यावेळी केली.

## भिवंडीतील अन्सार मोहल्लूयात पाच वर्षीय चिमुरड्याचा पाण्याच्या टाकीत मृतदेह सापडल्याने खळबळ



**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडीतील अन्सार मोहल्लूयात पाच वर्षीय आहिद एजाज अन्सारी याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. १६ डिसेंबर रोजी घराजवळ खेळत असताना आहिद हरवला होता. दोन दिवसांच्या शोधानंतर त्याचा मृतदेह एका मोडकळीस आलेल्या इमारतीच्या पाण्याच्या टाकीत सापडला.

आहिदचे वडील एजाज अन्सारी हे पावरलूम कारखान्यात मुकादम म्हणून काम करतात. १६ डिसेंबर रोजी संध्याकाळी नमाज अदा केल्यानंतर त्यांनी आहिदला बोलवण्यासाठी बहिणीला पाठवले, मात्र तो सापडला नाही. रात्री उशिरापर्यंत कुटुंबीयांनी व स्थानिक रहिवाशांनी शोध घेतला. शेवटी शांती नगर पोलिस ठाण्यात आहीद बेपत्ता झाल्याची तक्रार दाखल करण्यात आली.

पोलिसांनी तातडीने शोधमोहीम हाती घेतली. सीसीटीव्ही फुटेज तपासण्यात आले तसेच सोशल मीडियावरही मुलाच्या हरवल्याची माहिती पसरवण्यात आली. स्थानिकांनीही पोलिसांना सहकार्य करत आहिदचा शोध घेतला. मात्र १८ डिसेंबर रोजी सायंकाळी त्याचा मृतदेह एका एका मोडकळीस आलेल्या इमारतीच्या पाण्याच्या टाकीत सापडल्याने साऱ्या परिसरात खळबळ उडाली. सध्या मृतदेह शव विच्छेदनासाठी भिवंडी उपजिल्हा रुग्णालयात पाठवण्यात आले असून पोलीस या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करत आहेत.

आहिद पाण्याच्या टाकीत कसा पोहोचला, यामागील सत्य शोधण्यासाठी पोलिस तपास करत आहेत. ही घटना अपघात आहे की दुसऱ्या कोणत्यातरी कृत्याचा परिणाम, यावरही तपास सुरू आहे. या घटनेमुळे आहिदच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून अन्सार मोहल्लूयात शोककळा पसरली आहे. या दुर्दैवी घटनेने शहरातील मुलांच्या सुरक्षिततेबाबत प्रश्र्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

# आयशरच्या धडकेत १८ वर्षीय युवती ठार

- लांडेवाडी फाट्याजवळील घटना
- होतकरू तरुणीचा अकाली मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ



दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** आयशर ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने अठरा वर्षे तरुणी ठार झाली. ही घटना १८ डिसेंबर रोजी लांडेवाडी फाट्याजवळ सकाळी ८.३० वाजताच्या दरम्यान घडली. या घटनेत होतकरू तरुणीचा मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

प्राप्त माहितीनुसार सुरेश अंबादास धबडधाव वय ४५ रा. अण्णाभाऊ साठे नगर मेहकर यांनी डोणगाव पोलीस स्टेशनला फिर्याद दिले की,माजी भाची वैष्णवी वय १८ ही ग्रामिण कोटा फायनान्स (बचतगट) येथे मागील दोन महिन्यापासून काम करीत होती. त्या कामाकरीता ती नेहमी डोणगांव, जानेफळ, मेहकर येथे कामकरीता स्कुटीने जाणे येणे करीत होती. दि.१८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ७.३० वा दरम्यान वैष्णवी किरण चंदनशिव ही नेहमी प्रमाणे तिच्या कामाकरीता तिच्या कडील विनानंबरची स्कुटीने मेहकर येथून डोणगांव ला निघाली व अंदाजे ८.३० वा दरम्यान लांडेवाडी फाट्याजवळ आली असता विरुध्द दिशेने एम एच ०४ जीआर ०८६७ या क्रमांकाच्या टाटा कंपनीच्या आयशर चालकाने भरधाव वेगाने येवून वैष्णवीच्या स्कुटीला जोराने धडक दिल्याने वैष्णवी हिच्या डोक्याला गंभीर मार लागुन रोडवर पडुन मयत झाली व स्कुटीची सुध्दा नुकसान झाले. अशा फिर्यादीवरून डोणगाव पोलिसांनी आयशर ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## 'जीएसटी' परिषदेत मंत्री आदिती तटकरे करणार राज्याचे प्रतिनिधीत्व

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** राजस्थानमधील जैसलमेर येथे होणाऱ्या डिसेंबर २०२४ च्या जीएसटी परिषदेमध्ये मंत्री आदिती तटकरे या राज्याचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. या परिषदेच्या पार्श्र्वभूमीवर मंत्री कु.तटकरे यांनी विधानभवन येथे झालेल्या बैठकीमध्ये अधिकाऱ्यांकडून जीएसटीबाबत सविस्तर आढावा घेतला.

या बैठकीस राज्य कर आयुक्त आशिष शर्मा, विक्रीकर सह आयुक्त किरण शिंदे, विक्रीकर उपायुक्त नंदकुमार दिघे आदी उपस्थित होते.

यावेळी मंत्री कु. तटकरे यांनी यापूर्वी झालेल्या 'जीएसटी' परिषदेमध्ये महाराष्ट्र राज्याने सुचविलेल्या सुधारणा, नव्याने सुचवावयाच्या सुधारणा, करांमध्ये विविध उद्योग, घटक यांना द्यावयाची सूट तसेच कररचनेमध्ये सुलभता आणि करदात्यांच्या व्याख्या सुस्पष्ट असण्याबाबतची माहिती घेतली. इलेक्ट्रीक वाहने, विमा हप्ते, कृषी उत्पादने यासारख्या क्षेत्रांना करांमध्ये सूट देण्याबाबत बैठकीमध्ये चर्चा करण्यात



आली. तसेच काही क्षेत्रांमध्ये करावयाची करकपात आणि करवाढ, त्यामुळे महसुलामध्ये येणारा फरक याची माहितीही मंत्री कु. तटकरे यांनी यावेळी घेतली.

जैसलमेर येथे दि. २० व २१ डिसेंबर २०२४ असे दोन दिवस ही जीएसटी परिषद होणार आहे. तसेच या परिषदेवेळी अर्थसंकल्पाविषयीही बैठक होणार आहे. यामध्ये राज्यांच्या अर्थसंकल्पाकडून असणाऱ्या अपेक्षांची चर्चा करण्यात येणार आहे. याविषयीही या बैठकीमध्ये चर्चा करण्यात आली.

## एकलव्य मॉडेल रेसिडेंशियल स्कुलमध्ये प्रवेशासाठी अर्ज स्विकारण्यास सुरुवात

### २३ फेब्रुवारी २०२५ रोजी होणार परीक्षा



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** इंग्रजी माध्यमाच्या एकलव्य रेसिडेंशियल पब्लिक स्कुलमध्ये प्रवेशासाठी अर्ज स्विकारण्यास सुरुवात झाली आहे. प्रवेश परीक्षा ही दि. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. इच्छूकांनी आपले अर्ज दि. १ फेब्रुवारी २०२५ पर्यंत प्रकल्प कार्यालयाकडे मुख्याध्यापकामार्फत सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या परिक्षेकरिता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांचे कार्यक्षेत्रातील अकोला, बुलढाणा व वाशिम या जिल्ह्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळा तसेच जिल्हा परिषद, नगरपालिका व महानगरपालिकेच्या प्राथमिक व माध्यमिक शाळा तसेच सर्व शासनमान्य अनुदानित प्राथमिक व माध्यमिक शाळेतील सन २०२४–२५ या शैक्षणिक वर्षामध्ये ५ वी, ६ वी, ७ वी व ८ वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जमातीचे विद्यार्थी या स्पर्धा परिक्षेसाठी पात्र राहतील. या सर्व शाळेतील मुख्याध्यापक यांनी प्रवेश परिक्षेचे आवेदन पात्र विद्यार्थ्यांकडून भरुन घेवून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला या कार्यालयाकडे सादर करावे. विहीत नमुन्यातील अर्ज संबंधित शासकीय किंवा अनुदानित आश्रम शाळेतील मुख्याध्यापक किंवा प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला यांचेकडे विनामुल्य उपलब्ध आहेत. आवेदन पत्रासोबत सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या वार्षिक उत्पन्नाचा तसेच पालकांचा किंवा विद्यार्थ्यांचा जातीचा दाखला जोडण्यात यावा.

परिक्षेचे ठिकाण व वेळ : प्रवेश परीक्षा दि.२३ फेब्रुवारी, २०२५ रोजी होणार असून इयत्ता ६ वी करिता सकाळी ११ ते १.०० या वेळेत व इयत्ता ७ वी ते ९ वी करिता सकाळी ११ ते २.०० या वेळेत होईल. ह्या परीक्षा शासकीय आश्रम शाळा, कोथळी ता. बार्शिटाकळी जि. अकोला व शासकीय आश्रम शाळा, घाटबोरी ता. मेहकर जि. बुलडाणा या ठिकाणी होणार आहे.

## पलसिध्द धर्मपीठ डोणगांव येथे गुरुदिक्षा कार्यक्रमाचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ

■ सुरेश फिसके

**डोणगाव :** श्रीमद् १००८ जगद्गुरू पलसिध्द महास्वामीजी यांचा मुर्ती प्राण प्रतिष्ठा वर्धापन दिन महोत्सवला डोणगांव नगरीत सुरवात झाली असुन दि १९ डिसेंबरला सकाळी ९ वाजता श्री सदगुरू सिध्द चैतन्य शिवाचार्य महाराज साखरखेर्डा यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरु दिक्षा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे,

स्थानिक पलसिध्द धर्मपीठ शाखा डोणगांव च्या वतिने दि १६/१२ पासुन वर्धापन दिनानिमित्त श्री ष ब्र १०८ प पू शिवाचार्य रत्न,वेदान्ताचार्य सद्गुरू सिध्दलिंग शिवाचार्य स्वामीजी यांच्या प्रेरणेने व सद्गुरू सिध्द चैतन्य शिवाचार्य महाराज, सद्गुरू शिव चैतन्य शिवाचार्य महाराज हदगाव, सद्गुरू विश्र्व चैतन्य शिवाचार्य महाराज आष्टी यांच्या प्रमुख मार्गदर्शनात संपन्न होत आहे,गुरुदिक्षा कार्यक्रम साठी अनेक भावी भक्तांनी नोंद केली आहे,या गुरु दिक्षा कार्यक्रम साठी अनेक विरशैव लिंगायत समाजातील मान्यवर मंडळी उपस्थित राहणार आहेत,



या वर्धापन दिन महोत्सवात दैनंदिन जगद्गुरू पलसिध्द महास्वामीजी यांच्या मुर्तीवर रुद्राभिषेक,पलसिध्द चरित्रामृत व परमहस्य ग्रंथाचे पारायण, सामूहिक भजन व शिवपाठाचे नियोजीत कार्यक्रम सुरू आहेत

गुरु दिक्षा कार्यक्रमाचा परिसरातील सर्व वीरशैव लिंगायत समाज व सर्व समाजातील भावी भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री पलसिध्द सेवा संघ व भावीक भक्त मंडळी यांनी केले आहे,

